महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/१८७७ 1877
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
**दिनांक: २२.०१.२०२१**

# परिपत्रक

**विषय: ध्वजदिन निधी संकलन वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१**

.....

आपल्या देशाच्या सशस्त्र दलातील सैनिक हा आपल्या सर्वांचा प्रेमाचा, आदराचा आणि अभिमानाचा विषय होय. देशाच्या बहुमोल स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे तो प्राणपणाने रक्षण करतो. आपत्तीच्या काळात आपद्ग्रस्त देशबांधवांच्या मदतीलाही धावून जातो. उन्हातान्हाची, थंडीपावसाची वा कोणत्याही अडचणीची पर्वा न करता हा बहाद्दुर जवान आपली कर्तव्ये बजावत असतो. परकीय शक्तीपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपल्या पाठीशी भक्कमपणे अहोरात्र उभ्या राहणाऱ्या या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण असते ते अंशत: जरी फेडायला मिळाले तरी आपल्या सर्वांच्या दृष्टीने ती मोठी संधी ठरते. दरवर्षी याच भावनेतून ७ डिसेंबर, हा दिवस सशस्त्र दलांचा ध्वजादिन म्हणून साजरा होतो.

२. महावितरणने गेल्या गत वर्षात या निधीला मोठा हातभार लावला आहे. ही कर्तव्य भावना यावर्षीही उत्स्फुर्तपणे प्रकट होण्याच्या दुष्टीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्र.१३१०/जिसैकका-३०४ दि. ०३.०९.२०२० व पत्र क्र. १३०४/जिसैकका-३ दि. ०१.०१.२०२१ अन्वये केलेल्या विनंतीनुसार सक्षम अधिकारी यांनी वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१ करीता ध्वजदिन निधीचे खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे वेतनगट निहाय संकलन करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| वेतनगट | प्रत्येकी संकलित करण्यात येणारी रक्कम |
|---|---|
| १ | रु. ४००/- |
| २ | रु. ३००/- |
| ३ | रु. २००/- |
| ४ | रु. १००/- |

३. वरिल तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले संकलन हे सांघिक कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे वर्ष २०१९-२० साठीची ध्वजदिन निधीची रक्कम फेब्रुवारी २०२१ च्या वेतनातुन व वर्ष २०२०-२१ साठीची रक्कम नोव्हेंबर २०२१ महिन्याच्या वेतनातुन संकलित करण्याची सक्षम अधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची मासिक वेतनातुन रक्कम वसुल करण्यास हरकत असेल त्यांनी Employee Portal द्वारा त्यांचा पर्याय वर्ष २०१९-२० साठी दि. १५.०२.२०२१ पूर्वी व वर्ष २०२०-२१ साठी ३० जून २०२१ पूर्वी सादर करावेत. ज्या कर्मचाऱ्यांनी हरकत नोंदविली आहे अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ध्वजदिन निधीची रक्कम कपात करण्यात येणार नाही.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या Employee Portal/ e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

Sd/-
(राजेंद्र ब. पांडे)
महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)

D:\Old Data\O&M 01.07.2017\F-348 Govt.Ref\ON\Dhayjdin nidhi 22012021.docx